मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



# देवाकडून पाठविलेला मनुष्य

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Byron Unger; Lazarus
रूपान्तरकार: E. Frischbutter; Sarah S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

एके दिवशी, देवाच्या मंदिरात, जखऱ्या नावाचा एक वृध्द् याजक धूप जाळत होता. मंदिराच्या बाहेर लोक प्रार्थना करीत होते. अचानक जखऱ्या अस्वस्थ व भयभीत झाला तो हादरला.



एक देवदुत तेथे आला होता. तो त्याला म्हणाला, "भिऊ नको, देवाने मला येथे पाठविले आहे. तुझ्या पत्नीला मुलगा होईल. त्याचे नाव योहान असे ठेव. तो जन्मापासूनच पवित्र आत्म्याने भरलेला असेल. तो पुष्कळांस परमेश्वराकडे वळवील."



बाहेरील लोक गोंधळून त्याला म्हणाले, "जखऱ्या तूं आमच्याशी बोल." देवाच्या संदेशावर जखऱ्याने विश्वास केला नसल्यामुळे बाळाच्या जन्मापर्यंत तू बोलू शकणार नाही असे देवाचा दुत गॅब्रीएल याने त्याला सांगितले आहे, हे त्या लोकांना माहित नव्हते. आता त्याची पत्नी फारच म्हातारी झाली आहे; तर मुल कसे होईल असे जखऱ्याला वाटत होते.



घरी गेल्यावर, देवदुताने त्याला जे काही सांगितले होते ते सर्व त्याने लिहून सांगितले. त्याची पत्नी अलीशिबा अचंबित झाली. लेकरासाठी ते सदोदीत प्रार्थना करित होते. असे होणे आता शक्य होते का?





मुल जन्माला येणार हे
अलीशिबेला लवकरच
कळले. तिने देवाची
स्तुति केली. एके दिवशी,
तिची चुलती मरिया हिने
तिची भेट घेतली.
मरियेला सुध्द्रा दिवस
गेले होते, ती देखिल
लवकरच बाळाला जन्म
देणार होती.



जेंव्हा मरिया अलीशिबेकडे येऊन पोहोचली तेंव्हा तिच्या पोटात तिच्या बाळाने उडी मारल्याचे तिला जाणवले. अलीशिबा पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाली. मरियेच्या पोटातील बाळ म्हणजे प्रभू येशू ख्रिस्त आहे हे तिला माहित होते. त्या दोघींनी मिळून देवाची आनंदाने स्तुति केली.



देवाने अभिवचन दिल्याप्रमाणे अलीशिबेच्या बाळाचा जन्म झाला. "त्याच्या बापाच्या नावावरुन याचे नाव देखिल जखऱ्याच ठेवा" असे इतर याजक म्हणत होते. देवाने केलेली आज्ञा जखऱ्याच्या लक्षात होती. "नाही, याचे नाव योहान असे आहे" हे शब्द जेंव्हा त्याने पाटीवर लिहिले, तेंव्हा तो पुन्हा बोलू लागला. मग तो देवाचा धन्यवाद करु लागला.



जेंव्हा योहान मोठा झाला, तेंव्हा तो देवाचा महान सेवक एलिया सारखा बनला. योहानाने लोकांना सांगितले की, मसिहा लवकरच त्यांना आशिर्वाद देण्यासाठी येणार आहे. यहुदी पुढाऱ्यांना योहान आवडत नसे कारण तो त्यांना "पश्चाताप करा ! पाप करणे थांबवा" असे म्हणत असे. त्यांना त्यांच्या पापाविषयी ऐकायला नको होते.

इतर लोक त्याला बाप्तिस्मा करणारा योहान असे म्हणत, कारण लोकांना त्यांच्या पापाचा पश्चात्ताप झाला आहे हे दर्शविण्यासाठी तो त्यांना पाण्यात बुडवून बाहेर काढीत असे. एके दिवशी, बाप्तिस्मा घेण्यासाठी येशू योहानाकडे आला. योहानाने स्वतः चा बचाव करित म्हटले, "मी तुमच्या हातुन बाप्तिस्मा घ्यायला हवा." परंतू येशूने त्याला म्हटले, "आता हे असे होऊ दे." आणि योहानाने त्याचा बाप्तिस्मा केला.



येशूचा बाप्तिस्मा झाल्यानंतर, आकाशातून कबुतराच्या रुपात पवित्र आत्मा येशूवर उतरतांना योहानाने पाहिला. हे देवाचे चिन्ह होते. येशू हा देवाचा पुत्र आहे हे योहानाला माहित होते. जगाचे पाप नाहीसे करणारा देवाचा कोकरा असे योहानाने येशूला संबोधले आहे.



पुष्कळ लोकांना योहानाने देवाकडे आणले होते. परंतू दुष्ट राजा हेरोद याने योहानाला तुरुंगात टाकले. "तुझ्या भावाची पत्नी हेरोदिया हिला तुझी पत्नी अशी करुन घेणे हे तुझे पाप आहे." असे योहानाने हेरोद राजाला सांगितले होते. हे खरे आहे असे हेरोदाला माहित होते. योहान हा नीतिमान व पवित्र असा देवाचा सेवक आहे हे हेरोदाला माहित होते. परंतू त्याला पाप करण्याचे थांबविण्याची ईच्छा नव्हती. आणि योहान जरी तुरुंगात असला तरी पापाविरुध्द् संदेश देण्याचे तो थांबवणार नव्हता.



हेरोदाच्या वाढदिवशी त्याने मोठी मेजवानी आयोजित केली. हेरोदियाच्या मुलीने त्याच्यासाठी नृत्य केले. हेरोदाला ते फार आवडले, म्हणून "तुला काय हवे ते माग, जरी माझे अर्धे राज्य असेल तरी ते मी तुला देईन" असे वचन हेरोदाने त्या मुलिला दिले.





"मी काय मागावे?" अशा विचारांत ती मुलगी पडली. तिची दुष्ट आई हेरोदिया, जी बाप्तिस्मा करणारा योहान याचा तिरस्कार करित होती, तिने काय मागावे ते सांगितले! ते फारच भयानक असे होते!

"एका ताटात मला बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे डोके आणून द्यावे अशी माझी इच्छा आहे" असे त्या मुलिने हेरोद राजाला सांगितले. तेंव्हा राजाने दिलेल्या वचनामुळे तो दुःखी झाला, परंतु तो एवढा गर्विष्ठ होता की ते वचन तो मोडू शकला नाही. "योहानाचे डोके कापून येथे घेऊन या" अशी हेरोदाने आज्ञा केली. त्याच्या सैनिकांनी त्याचे पालन केले.



देवाच्या शुरविर; धैर्यवान आणि विश्वासू सेवकाचे शरीर योहानाच्या मित्रांनी दुःखाने पुरले. देवासाठी योहानाचे जे काम होते ते पुर्ण झाले होते. येशू त्यांना त्यांच्या या दुःखात समाधान देऊ शकेल हे कदाचित त्यांना माहित असावे.



देवाकडून पाठविलेला मनुष्य

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मार्क ६, लूक १, ३

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16